महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा.क्र. : ना.बँका/डी-४/नियो.महा.स्टे.को-ऑप.क्रे.सो.डिपॉ.गॅरं.कार्पो/०३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय

दिनांक १२-६-२००३

# परिपत्रक

## विषय : नियोजित महाराष्ट्र स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन लि., कोल्हापूर या संस्थेत गुंतवणूक करणेबाबत.

राज्यात नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे व त्यानुसार सामान्य ठेवीदारांच्या ठेवीचा ओघही नागरी सहकारी पतसंस्थांकडे वाढत आहे. अशा वेळेस ठेवीदारांच्या ठेवींच्या सुरक्षिततेचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर भेडसावू लागला आहे, ही बाब व ठेवीदारांचे हित लक्षात घेऊन राज्य स्तरावर नियोजित महाराष्ट्र स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन लि. ही संस्था स्थापन करण्यात येत आहे. सबब नियोजित संस्थेस निधी उपलब्ध होण्याचे दृष्टीने राज्यातील ज्या नागरी सहकारी पतसंस्थांचे खेळते भांडवल रु. १ कोटी हून अधिक आहे. अशा संस्थांनी किमान १% इतकी रक्कम संस्थेच्या भाग भांडवलात अंशदान म्हणून नियोजित महाराष्ट्र स्टेट को-ऑप. क्रेडीट सोसायटी डिपॉझीट गॅरंटी कॉर्पोरेशन लि. १९८/३/९ बाळकृष्ण चेंबर्स, ताराराणी चौक, कोल्हापूर या संस्थेत गुंतवण्यात यावी. सदर संस्थेत केलेली गुंतवणूक २०% तरलतेची गुंतवणूक समजण्यात येईल.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति :

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.
१९८/३/९ बाळकृष्ण चेंबर्स, ताराराणी चौक, कोल्हापूर.
४) जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. (सर्व)

उपरोक्त नियोजित संस्थेच्या भाग भांडवलात अंशदान तात्काळ उपलब्ध होईल याबाबत आपले स्तरावरुनही कार्यवाही करण्यात यावी.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे.